# *आर्थिक घडामोडी

**Megha Satras**

**(Dy. Director of Industries 2024)**

UPSC GUIDE
BY THE ACHIEVERS FOR THE ASPIRANTS

## ➢ राष्ट्रीय सहकार धोरण 2025 (National Cooperative Policy 2025)

- घोषणा:24 जुलै 2025 रोजी जाहीर. Amit Shah (केंद्रीय गृह व सहकार मंत्री).
- मसुदा तयार करणारी समिती अध्यक्ष – Suresh Prabhu
- स्वातंत्र्यानंतरचे दुसरे राष्ट्रीय सहकार धोरण.
- पहिले राष्ट्रीय सहकार धोरण – 2002.

➢ मुख्य उद्दिष्टे:

- 50 कोटी लोकांना सहकार क्षेत्राशी जोडणे.
- 2047 पर्यंत विकसित भारत घडवण्यासाठी सहकार क्षेत्राचा वापर.
- प्रत्येक गावात किमान एक सहकारी संस्था स्थापन करणे.
- 2026 पर्यंत 2 लाख प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) स्थापन करणे.

➢ धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी 6 प्रमुख स्तंभ (Pillars) निश्चित:

1) पाया मजबूत करणे (Strengthening the foundation)
2) कार्यक्षमता व चैतन्य वाढवणे
3) भविष्यासाठी सक्षम सहकारी संस्था तयार करणे
4) सर्वसमावेशकता व व्याप्ती वाढवणे
5) नवीन क्षेत्रांमध्ये सहकाराचा विस्तार
6) युवा पिढीला सहकार विकासासाठी तयार करणे

## ➢ सहकार क्षेत्राशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे:

- आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष – 2025
- सहकार मंत्रालयाची स्थापना – 2021
- भारताचे पहिले सहकार मंत्री – Amit Shah
- मंत्रालयाचे व्हिजन – “सहकार से समृद्धी”
- भारतातील पहिले राष्ट्रीय सहकार विद्यापीठ: Tribhuvan Sahkari University, आनंद (गुजरात)
- भारतातील पहिला सहकार कायदा – 1904, शिफारस – Edward Law Committee
- घटनात्मक तरतुदी :
- सहकार हा राज्य सूचीतील विषय.
- घटनात्मक दर्जा – 97th Constitutional Amendment of India (2011)

## ➢ भारत-यूके मुक्त व्यापार करार :

भारत आणि युनायटेड किंगडममधील मुक्त व्यापार करारावर 24 जुलै 2025 रोजी वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि ब्रिटनचे वाणिज्य मंत्री जोनाथन रेनॉल्ड यांनी स्वाक्षरी केली. भारताचा हा 16 वा मुक्त व्यापार करार आहे.

कराराचे नाव व्यापक आर्थिक व्यापार करार (Comprehensive Economic Trade Agreement) या करारामुळे द्विपक्षीय व्यापार दरवर्षी सुमारे 34 अब्ज डॉलरने वाढण्याची अपेक्षा आहे.

## ➢ भारताने मुक्त व्यापार करार (FTA) केलेले देश / गट:

**1) द्विपक्षीय FTA (Bilateral Agreements):**

Sri Lanka,Bhutan,Thailand,Singapore,Malaysia,South Korea
Japan,Australia,United Arab Emirates,Mauritius,United Kingdom

**2) प्रादेशिक / गट करार (Regional Agreements):**

Association of Southeast Asian Nations (ASEAN)
European Free Trade Association (EFTA)

## ➢ महाराष्ट्राची अर्थव्यवस्था : $1 ट्रिलियनकडे वाटचाल:

आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था Morgan Stanley च्या अहवालानुसार 2030 पर्यंत महाराष्ट्राचे GDP सुमारे 1 ट्रिलियन डॉलर (1 लाख कोटी डॉलर) होण्याची शक्यता.

➢ महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेबाबत :

- महाराष्ट्राचा सध्याचा GDP सुमारे 536 अब्ज डॉलर. भारतीय राज्यांमध्ये सर्वाधिक GDP असलेले राज्य.
- अर्थव्यवस्थेच्या आकारानुसार महाराष्ट्र जगातील सुमारे 28 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था मानली जाते.
- राज्याचा GDP Singapore च्या GDP इतका जवळपास आहे.
- आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये भारतातील एकूण FDI पैकी 39.2% हिस्सा महाराष्ट्राकडे.त्यामुळे थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर.

➢ क्षेत्रनिहाय GDP मधील वाटा:

| क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|
| सेवा क्षेत्र | 64.3 % |
| उद्योग क्षेत्र | 22.5 % |
| कृषी क्षेत्र | 13.2 % |

## ➢ बल्गेरियाने युरो चलन स्वीकारण्याचा निर्णय:

जुलै 2025 मध्ये European Union ने Bulgaria ला 1 जानेवारी 2026 पासून युरो चलन स्वीकारण्यास मंजुरी दिली.त्यामुळे बल्गेरिया युरोजोनचा 21 वा सदस्य ठरणार आहे.यापूर्वी देशाचे चलन Bulgarian lev होते.

## ➢ युरोजोन (Eurozone):

- युरो चलन स्वीकारलेल्या EU देशांचा गट म्हणजे Eurozone.
- सध्या 21 सदस्य देश.
- Croatia हा EU मधील 20 वा देश होता ज्याने 1 जानेवारी 2023 रोजी युरो स्वीकारले.
- 1 जानेवारी 2002 रोजी पहिली युरो नोटा आणि नाणी चलनात आणली गेली.
- युरो हे United States dollar नंतर जगातील दुसरे सर्वाधिक व्यापार होणारे चलन आहे

## ➤ भारतातील थेट परकीय गुंतवणूक (FDI) 2024–25

स्रोत: Department for Promotion of Industry and Internal Trade (DPIIT)

### ➤ एकूण FDI प्रवाह:

| आर्थिक वर्ष | FDI प्रवाह |
|---|---|
| 2024–25 | 81.04 अब्ज डॉलर |
| 2023–24 | 71.28 अब्ज डॉलर |

एका वर्षात सुमारे 14% वाढ.

### ➤ राज्यनिहाय सर्वाधिक FDI प्राप्त:

| क्रमांक | राज्य | FDI (अब्जडॉलर) टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | Maharashtra | 19.631% |
| 2 | Karnataka | 6.620% |
| 3 | Delhi | 6.012% |
| 4 | Gujarat | 5.711% |
| 5 | Tamil Nadu | 3.117% |

## ➢ क्षेत्र निहाय FDI प्रवाह:

| क्रमांक | क्षेत्र | वाटा |
|---|---|---|
| 1 | सेवा क्षेत्र | 19% |
| 2 | संगणक सॉफ्टवेअर व हार्डवेअर | 16% |
| 3 | व्यापार | 8% |

## ➢ सर्वाधिक गुंतवणूक करणारे देश

| क्रमांक | देश | वाटा |
|---|---|---|
| 1 | Singapore | 30% |
| 2 | Mauritius | 17% |
| 3 | United States | 11% |

## ➢ रेपो दरामध्ये कपात –

**Reserve Bank of India च्या चलनविषयक धोरण समिती (MPC) ने 6 जून 2025 रोजी रेपो दरात 50 बेसिस पॉइंट्सची कपात केली.त्यामुळे रेपो दर 5.50% झाला.**

- **उद्देश:महागाई 4% च्या आसपास नियंत्रित राहिल्यानेआर्थिक वाढ (Economic Growth) वाढवण्यासाठी कर्ज स्वस्त करणे.**

## ➢ RBI चे प्रमुख धोरणात्मक दर:

| दर | टक्केवारी |
|---|---|
| रेपो दर | 5.50 % |
| रिव्हर्स रेपो दर | 3.35 % |
| स्थायी ठेव सुविधा (SDF) | 5.75 % |
| सीमांत स्थायी सुविधा (MSF) | 5.75 % |
| बँक दर | 5.75 % |
| रोख राखीव प्रमाण (CRR) | 3 % |
| वैधानिक तरलता प्रमाण (SLR) | 18 % |

## ➢ रेपो दर (Repo Rate / Repurchase Rate):

**Reserve Bank of India सरकारी रोख्यांच्या बदल्यात व्यावसायिक बँकांना अल्पकालीन कर्ज ज्या दराने देते, त्या दराला रेपो दर म्हणतात.**

- **RBI अर्थव्यवस्थेतील चलनविषयक नियंत्रणासाठी रेपो दराचा वापर करते:**
- **तरलता (Liquidity) नियंत्रण**
- **चलनवाढ (Inflation) नियंत्रण**
- **आर्थिक वाढ (Economic Growth) प्रोत्साहन**
- **रेपो दर कमी → कर्ज स्वस्त → गुंतवणूक व खर्च वाढ → आर्थिक वाढ**

## ➢ भारत – जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था

**घोषणा: NITI Aayog च्या दहाव्या प्रशासकीय परिषद बैठकीनंतर NITI Aayog चे CEO B. V. R. Subrahmanyam यांनी माहिती दिली की भारताने Japan ला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली आहे.**

## ➢ 2025 मधील जगातील प्रमुख अर्थव्यवस्था (Nominal GDP):

| क्रमांक | देश | GDP (ट्रिलियन डॉलर) |
|---|---|---|
| 1 | United States | 302 |
| 2 | China | 193 |
| 3 | Germany | 4.7 |
| 4 | India | 4.187 |
| 5 | Japan | 4.186 |
| 6 | United Kingdom | 3.83 |
| 7 | France | 3.2 |

## ➢ न्यू डेव्हलपमेंट बँक (NDB)नवीन सदस्य

मे 2025 मध्ये Algeria हा New Development Bank चा नवीन सदस्य बनला.5 जुलै 2025 रोजी Colombia आणि Uzbekistan देखील अधिकृतपणे NDB मध्ये सामील झाले.त्यामुळे NDB ची एकूण सदस्य संख्या 13 झाली.

## ➢ NDB बद्दल :

- स्थापना : जुलै 2014
- स्थापना निर्णय: BRICS शिखर परिषद,Fortaleza, Brazil
- मुख्यालय: Shanghai, China
- आधीचे नाव : BRICS Development Bank
- सध्याच्या अध्यक्ष : Dilma Rousseff (ब्राझील)
- उद्दिष्ट: उदयन्मुख अर्थव्यवस्था आणि विकसनशील देशांमध्ये पायाभूत सुविधा (Infrastructure),शाश्वत विकास (Sustainable Development) यासाठी निधी उपलब्ध करून देणे.

## ➢ NDB चे सदस्य देश (13):

- **मूळ BRICS सदस्य:Brazil,Russia,India,China,South Africa**
- **नवीन सदस्य: 6. Bangladesh 7. Egypt 8. United Arab Emirates 9. Uruguay 10. Algeria 11. Colombia 12. Uzbekistan 13. Indonesia**

UPSC GUIDE
BY THE ACHIEVERS FOR THE ASPIRANTS

## ➢ GST संकलनात महाराष्ट्र अव्वल (2024–25):

**एकूण GST संकलनआर्थिक वर्ष 2024–25 मध्ये भारतातील एकूण GST संकलन 16.75 लाख कोटी रुपये इतके झाले.आकडेवारी: GST Council**

**सर्वाधिक GST संकलन करणारी राज्ये**

| क्रमांक | राज्य | GST संकलन (कोटी रुपये) |
|---|---|---|
| 1 | Maharashtra | 3,18,497 |
| 2 | Karnataka | 1,43,023 |
| 3 | Gujarat | 1,74,938 |
| 4 | Tamil Nadu | 1,12,456 |
| 5 | Uttar Pradesh | 1,05,799 |

**त्यामुळे महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक GST संकलन करणारे राज्य ठरले**

## ➢ मलेशियाकडून सर्वाधिक मोठा पाम तेल निर्यात :

- भारत मलेशियाच्या पाम तेल बियाणांचा सर्वात मोठा आयातदार देश ठरला आहे.
- जगातील नव्वद टक्के पाम तेल वृक्ष मलेशिया आणि इंडोनेशियामध्ये आहे.
- पाम तेलाचा सर्वाधिक आयातदार भारत
- पाम तेलाचे सर्वाधिक उत्पादन आंध्र प्रदेश
- भारत एकूण तेल आयातीपैकी 56% पाम तेलाची आयात करतो

## ➢ त्रिनिदाद आणि टोबॅगोमध्ये UPI सेवा सुरू:

Trinidad and Tobago हा भारतीय पर्यटकांसाठी UPI सेवा सुरू करणारा पहिला कॅरेबियन देश ठरला आहे.तसेच तो UPI स्वीकारणारा जगातील 8 वा देश बनला आहे

## ➢ देशातील पहिले राष्ट्रीय सहकारी विद्यापीठ :

केंद्रीय सहकार आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते 5 जुलै 2025 रोजी आनंद,गुजरात येथे देशातील पहिले राष्ट्रीय सहकारी विद्यापीठाचे भूमिपूजन करण्यात आले. या विद्यापीठाचे नाव त्रिभुवन सहकारी विद्यापीठ असे असेल. भारताच्या सहकार क्षेत्राला बळकटी देण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी उद्दिष्ट आहे.

## ➢ गोवा फेणीला GI दर्जा :

गोव्याच्या फेणी या मद्याला भौगोलिक संकेत GI टॅग देण्यात आला आहे. काजू,सफरचंद किंवा नारळाच्या रसापासून हे पारंपारिक मद्य तयार केले जाते. 1600 व्या दशकात पोर्तुगीज मिशिनरांनी काजूची रोप्यांनी उर्ध्वपातन पद्धती(Distillation) सुरू केल्यापासून हे मद्य तयार केले जाते. यासह हे भारतातील GI टॅग मिळवणारी पहिली फेणी ठरली आहे.

## ➤ जागतिक दारिद्र्य रेषेत बदल:

जागतिक बँकेने अद्ययावत किंमत माहिती आणि सर्वेक्षण पद्धतींच्या आधारे जागतिक दारिद्र्य रेषा $2.15/दिवस वरून $3/दिवस पर्यंत सुधारित केली आहे. ही रेषा प्रामुख्याने कमी उत्पन्न असलेल्या देशांसाठी लागू केली जाते. दारिद्र्य रेषा ठरवताना Purchasing Power Parity (PPP) वापरली जाते.PPP मुळे विविध देशांतील चलनमूल्य आणि किंमतींची तुलना करता येते.

| जुनी दारिद्र्य रेषा | नवीन दारिद्र्य रेषा |
|---|---|
| $2.15 प्रति दिवस | $3 प्रति दिवस |

## ➤ फ्लिपकार्ट ला NBFC परवाना:

Flipkart ला Reserve Bank of India कडून NBFC (Non-Banking Financial Company) परवाना मिळाला आहे.त्यामुळे कंपनीला ग्राहक आणि विक्रेत्यांना कर्ज देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.भारतातील मोठ्या ई-कॉमर्स कंपनीला NBFC परवाना मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे.

NBFC (Non-Banking Financial Company) म्हणजे बँक नसलेली परंतु कर्ज देणे, गुंतवणूक, वित्तीय सेवा देणारी संस्था.या संस्थांचे नियमन RBI करते

## ➢ ऑरेंज इकोनॉमी:

मुंबई येथे झालेल्या WAVES Summit परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑरेंज इकोनॉमीचा पुरस्कार केला. सर्जनशीलता, संस्कृती आणि बौद्धिक संपत्तीद्वारे चालवल्या जाणाऱ्या आर्थिक क्रियाकलापांना ऑरेंज इकोनॉमी किंवा क्रिएटिव्ह इकोनॉमी असे म्हणले जाते.(चित्रपट आणि मनोरंजन उद्योग,संगीत, कला आणि नृत्य,साहित्य आणि प्रकाशन,फॅशन आणि डिझाईन,गेमिंग आणि डिजिटल मीडिया,सांस्कृतिक पर्यटन)

## ➢ GST परिषदेची 56 वी बैठक:

बैठकीचे ठिकाण: New Delhi

अध्यक्ष: Nirmala Sitharaman (केंद्रीय वित्तमंत्री)

संस्था: GST Council

GST दर रचनेत बदलपूर्वीची GST दर रचना: 5%, 12%, 18%, 28% (चार स्तरीय रचना)परिषदेनं ही रचना सोप्या स्वरूपात बदलण्याचा निर्णय घेतला.

- **नवीन प्रस्तावित रचनादर:**

| प्रकार | टक्केवारी |
|---|---|
| Merit Rate (योग्यता दर) | 5 % |
| Standard Rate (प्रमाणित दर) | 18 % |
| Demerit / Special Rate (निवडक वस्तू व सेवांसाठी) | 40 % |

- म्हणजेच मुख्य दोन दर (5% आणि 18%) ठेवून GST रचना साधी करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- **GST दर रचना (सुधारित – मुख्य वस्तू/सेवा):**
- **0% दर (करमुक्त):**

सर्व वैयक्तिक जीवन आणि आरोग्य विमा,जीवनरक्षक औषधे,Ultra High Temperature (UHT) दूध,पॅकेज्ड पनीर,चपाती, रोटी, पराठा

- **5% दर (Merit Rate):**

औषधे व आरोग्य,इतर सर्व औषधे व वैद्यकीय उपकरणे,दैनंदिन वापराच्या वस्तू,साबण,शॅम्पू, टूथब्रश,टूथपेस्ट,इतर वस्तू,सायकल,भांडी व किचनवेअर,पॅकेज्ड खाद्यपदार्थ,कृषी उपकरणे, ट्रॅक्टर,माती तयार करण्याची, कापणीची व मळणीची यंत्रसामग्री,इतर,हस्तकला वस्तू,मार्बल व ग्रॅनाइट ब्लॉक्स,सेवा,हॉटेल निवास सेवा,ब्युटी आणि फिजिकल वेलबिंग सेवा

## जीएसटी परिषद (GST Council):

- संवैधानिक आधार: Article 279A of the Constitution of India
- स्थापना: २०१६
- अध्यक्ष: केंद्रीय वित्तमंत्री – सध्या Nirmala Sitharaman
- सदस्य:केंद्रीय महसूल / अर्थ राज्यमंत्री,सर्व राज्यांचे वित्तमंत्री किंवा नामनिर्देशित मंत्री
- मतदान पद्धती: निर्णयासाठी ७५% बहुमत आवश्यक
- केंद्र सरकारचे मत: १/३ (33.33%)
- राज्य सरकारांचे मत: २/३ (66.67%)
- प्रमुख कार्य:

1) जीएसटीचे दर (Rates) निश्चित करणे.
2) नियम व नियमावली ठरवणे.
3) दरांमध्ये बदल किंवा सुधारणा सुचवणे.

## ➢ पीएम मित्रा पार्कची पायाभरणी :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 17 सप्टेंबर 2025 रोजी मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यातील बदनावर येथे देशातील पहिला पीएम मेगा इंटिग्रेटेड टेक्स्टाईल रिजन अँड ॲपॅरल(PM MITRA)पार्कची पायाभरणी केली.

## ➢ पीएम मित्रा पार्क योजना:

- पूर्ण नाव: Prime Minister Mega Integrated Textile Region and Apparel (PM MITRA)
- अंमलबजावणी मंत्रालय: Ministry of Textiles

➢ उद्देश: भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्राला बळकटी देणे आणि Sustainable Development Goal 9 साध्य करण्यात मदत करणे.

## ➢ SDG-9 चे उद्दिष्ट:

- मजबूत पायाभूत सुविधा निर्माण करणे
- शाश्वत औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन देणे
- नवकल्पना वाढवणे

## ➢ भारतातील प्रस्तावित ७ PM MITRA पार्क:

| क्र. | राज्य | ठिकाण |
|---|---|---|
| 1) | Tamil Nadu | विरुधुनगर |
| 2) | Telangana | वारंगल |
| 3) | Gujarat | नवसारी |
| 4) | Karnataka | कलबुर्गी |
| 5) | Madhya Pradesh | धार |
| 6) | Uttar Pradesh | लखनौ |
| 7) | Maharashtra | अमरावती |

## महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नाविन्यता धोरण 2025:

- धोरण जाहीर करणारा विभाग: Skill Employment Entrepreneurship and Innovation Department

## धोरणाचे उद्दिष्ट :

- शहरी व ग्रामीण भागात नाविन्यता (Innovation) वाढवणे,
- स्वयंरोजगार व उद्योजकता प्रोत्साहन देणे
- स्टार्टअप इकोसिस्टम मजबूत करणे

## पंचवार्षिक रणनीती (Targets):

- 1.25 लाख नवीन उद्योजक तयार करणे
- 15,000 स्टार्टअप्स सुरू करणे
- राज्यभर ITI, पॉलिटेक्निक आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मायक्रो-इन्क्युबेटर स्थापन केले जातील.
- प्रत्येक प्रशासकीय विभागात "Regional Innovation & Entrepreneurship Hub" उभारले जातील.

- 9.5 लाख पदवीधर व ITI उत्तीर्ण युवकांची तपासणी
- त्यापैकी 25,000 युवकांची आर्थिक व इन्क्युबेशन सहाय्यासाठी निवड

➢ **आर्थिक सहाय्य:**

| घटक | आर्थिक मदत |
| --- | --- |
| देशांतर्गत पेटंट | ₹5 लाख |
| आंतरराष्ट्रीय पेटंट | ₹20 लाख |
| गुणवत्ता प्रमाणपत्र | ₹5 लाख |

➢ **महिलांसाठी पहिले UPI Wallet:**

LXME या फिनटेक प्लॅटफॉर्मने **LXME Pay** नावाचे देशातील महिलांसाठी पहिले UPI Wallet सुरू करण्याची घोषणा केली.

उद्देश: महिलांना डिजिटल पेमेंट, बचत आणि आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी सुरक्षित प्लॅटफॉर्म उपलब्ध करणे.महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे हा मुख्य हेतू आहे.

## ➢ चुनखडी (Limestone):

**Ministry of Mines यांनी 10 ऑक्टोबर 2025 रोजी चुनखडी (Limestone) ला पूर्णपणे प्रमुख खनिज (Major Mineral) म्हणून वर्गीकृत केले. चुनखडीचा वापर मुख्यत:सिमेंट उद्योग,स्टील उद्योग,बांधकाम क्षेत्रात केला जातो.**

## ➢ विकसित भारत स्ट्रॅटेजी रूम :

**निती आयोगाने मसुरी उत्तराखंड येथील लाल बहादूर शास्त्री नॅशनल अकॅडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन येथील विकसित भारत स्ट्रॅटेजी रूमचे उद्घाटन केले. अधिकारी प्रशिक्षणार्थींसाठी एक गतिमान प्रशासन केंद्र म्हणून कार्य करण्यासाठी या स्ट्रॅटेजी रूमची स्थापना करण्यात आली.**

## ➢ देशातील पहिले फ्रेट व्हिलेज:

**स्थान: मिल्कीपूर–रामनगर, उत्तर प्रदेश**

**हे भारतातील पहिले Freight Village म्हणून विकसित केले जात आहे.**

**Freight Village:**

**मल्टीमॉडल लॉजिस्टिक हब जेथे रस्ता,रेल्वे,जलमार्ग यांसारख्या विविध वाहतूक प्रणालींचे एकत्रीकरण केले जाते.**

## ➢ प्राप्तीकर संकलनात ऐतिहासिक बदल:

**भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच वैयक्तिक आयकर (Income Tax) संकलनाने कॉर्पोरेट कर (Corporate Tax) संकलनाला मागे टाकले आहे.**

**➢ थोडक्यात आकडे:**

| वर्ष | आयकर (वैयक्तिक) | कॉर्पोरेट कर |
|---|---|---|
| 2014 | 38.1% | 61.9% |
| 2024 | 53.4% | 46.6% |

- **अर्थव्यवस्थेत वैयक्तिक उत्पन्न आणि करदाते वाढले आहेत.**
- **कर आधार (Tax Base) विस्तारित झाला आहे.औपचारिक अर्थव्यवस्था (formal economy) आणि डिजिटल व्यवहार वाढले याचे संकेत मिळतात.**

## ➢ नवीन आधारभूत वर्षाचं स्वीकार :

केंद्र सरकारने औद्योगिक उत्पादन निर्देशांक IIPआणि सकल देशांतर्गत उत्पादन GDP साठी 2022-23 हे नवीन आधारवर्ष तसेच ग्राहक किंमत निर्देशांक CPI साठी 2024-25 हे नवीन आधारवर्ष म्हणून प्रस्तावित केलं आहे.

| घटक | नवीन आधारवर्ष | आधीचे आधारवर्ष |
| --- | --- | --- |
| औद्योगिक उत्पादन निर्देशांक (IIP) | 2022-23 | 2011-12 |
| सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) | 2022-23 | 2011-12 |
| ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) | 2024-25 | 2012-13 |

➢ **आधारवर्ष (Base Year):** एखाद्या आर्थिक निर्देशांकाची तुलना करण्यासाठी निवडलेले मानक वर्ष म्हणजे आधारवर्ष.

## ➢ गुजरात ठरले अव्वल निर्यातदार राज्य (2024–25):

**भारतीय निर्यात संघटना महासंघ (FIEO – Federation of Indian Export Organisations) च्या अहवालानुसार 2024–25 मध्ये गुजरात भारतातील सर्वाधिक निर्यात करणारे राज्य ठरले आहे.**

- **देशाच्या एकूण निर्यातीत गुजरातचा वाटा – 27.60% आहे.गुजरातने निर्यातीत इतर मोठ्या औद्योगिक राज्यांना मागे टाकले आहे.**

## ➢ भारतातील प्रमुख निर्यातदार राज्ये (2024–25):

| क्रमांक | राज्य | निर्यात मूल्य |
|---|---|---|
| 1 | गुजरात | ₹9.83 लाख कोटी |
| 2 | महाराष्ट्र | ₹5.57 लाख कोटी |
| 3 | तामिळनाडू | ₹4.40 लाख कोटी |
| 4 | कर्नाटक | ₹3.85 लाख कोटी |
| 5 | उत्तर प्रदेश | ₹1.86 लाख कोटी |

## ➢ GST मूल्यांकनासाठी फेसलेस प्रकल्प :

केरळ हे जीएसटी बाबतीत फेसलेस मूल्यांकन प्रणाली लागू करणारे भारतातील पहिले राज्य ठरले आहे.या प्रणालीमध्ये करदाते आणि कर अधिकारी यांच्यात प्रत्यक्ष संपर्क नसतो.सर्व प्रक्रिया ऑनलाइन आणि डिजिटल पद्धतीने केली जाते.

➢ केंद्र सरकारने आसाममधील नुमालीगढ रिफायनरी लिमिटेड (NRL) ला नवरत्न दर्जा बहाल केला आहे. या निर्णयामुळे NRL ही नवरत्न दर्जा मिळवणारी भारतातील 27 वी केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी (CPSE) ठरली आहे. नवरत्न दर्जा मिळाल्यामुळे कंपनीला गुंतवणूक आणि व्यावसायिक निर्णयांमध्ये अधिक स्वायत्तता मिळते.

## ➢ भारत – न्यूझीलंड मुक्त व्यापार करार (FTA):

भारत आणि न्यूझीलंड या दोन देशांनी ऐतिहासिक आणि महत्त्वाकांक्षी मुक्त व्यापार करार (FTA)यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. या करारामुळे न्यूझीलंडमध्ये निर्यात होणाऱ्या 100% भारतीय वस्तूंवरील सीमाशुल्क (Import Duty) पूर्णपणे माफ करण्यात आले आहे.

## ➢ सार्वजनिक उपक्रमांसाठी नवीन श्रेणी – शिवरत्न व तेजसरत्न

**केंद्र सरकारने केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे (CPSEs) वर्गीकरण अधिक प्रभावी करण्यासाठी दोन नवीन श्रेणी प्रस्तावित केल्या आहेत – शिवरत्न आणि तेजसरत्न.**

- **उद्देश : भारताला विकसित भारत बनवण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पण सध्याच्या महारत्न किंवा नवरत्न श्रेणींच्या कठोर आर्थिक निकषांमध्ये न बसणाऱ्या कंपन्यांना प्रोत्साहन देणे.**

**1)शिवरत्न श्रेणी : आपल्या क्षेत्रात प्रभाव निर्माण केलेल्या कंपन्यांसाठी.ज्यांच्याकडे उच्च वाढीची क्षमता आहे.अशा कंपन्यांना गुंतवणुकीचे निर्णय घेण्यासाठी अधिक स्वायत्तता दिली जाईल.**

**२) तेजसरत्न श्रेणी :नवीन तंत्रज्ञान आणि स्टार्टअप स्वरूपाच्या सरकारी कंपन्यांसाठी.'तेजस' म्हणजे ऊर्जा व गती, त्यामुळे वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान क्षेत्रांना ही श्रेणी लागू होईल**

## ➢ इन्वेस्ट महाराष्ट्र संस्था:

इन्वेस्ट महाराष्ट्र ही संस्था राज्यात गुंतवणूक वाढवण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे.

➢ स्थापनेचा उद्देश :

- राज्यात जास्तीत जास्त थेट परकीय गुंतवणूक (FDI) आकर्षित करणे.
- उद्योग, सेवा आणि पायाभूत क्षेत्रात गुंतवणूक वाढवणे.
- महाराष्ट्राला गुंतवणुकीसाठी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे.

➢ महत्त्वाची वैशिष्ट्ये :

- संस्थेचे भागभांडवल – 3000 कोटी रुपये.
- ही संस्था उद्योग, गुंतवणूक आणि सेवा (IINS) धोरण 2025 अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे.
- IINS धोरण 2025 चे उद्दिष्ट :पुढील 5 वर्षांत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था 1 ट्रिलियन डॉलर (एक लाख कोटी डॉलर्स) इतकी करणे

## भारत – ओमान CEPA करार:

- India आणि Oman यांच्यात CEPA (Comprehensive Economic Partnership Agreement) म्हणजेच सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार करण्यात आला आहे. हा करार दोन्ही देशांमधील व्यापार आणि गुंतवणूक वाढवण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो.
- ओमान भारताला आपल्या 89.08% टॅरिफ लाईन्सवरील वस्तूंना शुल्कमुक्त प्रवेश देईल.
- भारताने आपल्या एकूण टॅरिफ लाईन्सपैकी 77.19% वर आयात शुल्क कमी किंवा शिथिल केले आहे.

## मध्य प्रदेशमध्ये रोलिंग बजेट

- मध्य प्रदेश सरकारने 2026-27 आर्थिक वर्षापासून राज्यात रोलिंग बजेट ही नवी संकल्पना लागू करण्याची घोषणा केली आहे. ही संकल्पना लागू करणारे मध्य प्रदेश देशातील पहिले राज्य ठरणार आहे.
- ही एक बहुवर्षीय बजेट प्रणाली आहे. यामध्ये केवळ एका वर्षाची नियोजन न करता पुढील काही वर्षांचा (उदा. तीन ते पाच वर्षांचा) अंदाज घेऊन आराखडा तयार केला जातो.
- जरी नियोजन दीर्घकाळी असले तरी दरवर्षी मागील कामगिरीचा आढावा घेऊन तात्पुरत्या कालिक सुधारणा केल्या जातात.

## ➢ देशातील पहिले एकात्मिक आर्थिक शहर:

**Nirmala Sitharaman यांनी सांगितल्याप्रमाणे Amaravati (राजधानी – Andhra Pradesh) हे भारताचे पहिले "Integrated Financial City" (एकात्मिक आर्थिक शहर) म्हणून विकसित केले जात आहे. वित्तीय सेवा, बँकिंग, विमा आणि फिनटेक क्षेत्रांचे एकाच ठिकाणी केंद्र तयार करणे**

## ➢ अमेरिकेतील शटडाऊन समाप्त:

**Donald Trump यांनी 12 नोव्हेंबर 2025 रोजी स्टॉप-गॅप (तात्पुरता) खर्च विधेयक मंजूर करून अमेरिकन सरकारचा इतिहासातील सर्वात मोठा 43 दिवसांचा शटडाऊन समाप्त केला.**

**शटडाऊन : सरकारकडे खर्च करण्यासाठी आवश्यक निधी मंजूर नसणे.काँग्रेसकडून अर्थसंकल्प/खर्च विधेयक मंजूर न झाल्यास सरकारी कामकाज तात्पुरते बंद होते**

## ➢ स्वीडन – जगातील पहिला कॅशलेस देश:

**Sweden अधिकृतपणे जगातील पहिला कॅशलेस (रोखविरहित) देश बनला आहे. येथे बहुतेक व्यवहार डिजिटल पेमेंट पद्धतींनी केले जातात.**

## ➢ जागतिक सहकारी संस्थांच्या क्रमवारीत भारतातील संस्था:

- **Indian Farmers Fertiliser Cooperative Limited(IFFCO)आणि Gujarat Cooperative Milk Marketing Federation(AMUL) या भारतातील सहकारी क्षेत्रातील दोन मोठ्या संस्थांना जीडीपी आधारित कामगिरीच्या आधारावर जगातील सर्वोच्च सहकारी संस्थांमध्ये स्थान मिळाले आहे.**
- **ही जागतिक क्रमवारी International Cooperative Alliance द्वारे प्रकाशित होणाऱ्या World Cooperative Monitor या अहवालातून तयार केली जाते.**
- **ही क्रमवारी Doha येथे आयोजित ICA परिषदेत जाहीर करण्यात आली.**

## ➢ अलीकडे GI (Geographical Indication) प्राप्त उत्पादने:

| उत्पादन | राज्य | वैशिष्ट्य |
|---|---|---|
| 1) पन्ना हिरे | Madhya Pradesh | पन्ना जिल्ह्यातील प्रसिद्ध नैसर्गिक हिरे |
| 2) पोंडरू खादी | Andhra Pradesh | हाताने कापलेले व विणलेले सूती खादी कापड |
| 3) जरी पोशाख | Uttar Pradesh | जरी काम असलेले पारंपरिक पोशाख |
| 4)दावो शास्त्र | Arunachal Pradesh | हाताने बनवले जाणारे पारंपरिक शस्त्र |
| 5) मेरठ ब्यूगल | Uttar Pradesh | पारंपरिक लष्करी वाद्य |
| 6) अम्बाजी संगमरवर | Gujarat | दगडापासून बनवलेली स्वयंपाकाची भांडी |
| 7) अम्बा समुद्रम चोप्पू | Tamil Nadu | लाकडापासून बनवलेली पारंपरिक करंडी/छैनी |
| 8) थुया मंली तांदूळ | Tamil Nadu | सुगंधी पारंपरिक तांदूळ प्रकार |